# बाबा मुक्तानंदांच्या समयातीत शिकवणी

“तुमच्या रोमारोमात भगवंताचे प्रेम व्याप्त झाले पाहिजे.”

~ बाबा मुक्तानंद

बेन विल्यम्स् यांच्याद्वारे लिखित भाष्य

या शिकवणीत बाबा मुक्तानंद आपल्याला प्रोत्साहित करतात की, आपण दिव्य प्रेमाशी पूर्णपणे एकरूप व्हावे; त्यामध्ये यत्किंचितही कमतरता राहता कामा नये. भगवत्प्रेमाचा रस फक्त चाखल्याने किंवा त्या प्रेमाची केवळ एक झलक मिळाल्यानेदेखील आपले जीवन बदलून अधिक चांगले होऊ शकते. परमप्रेमाच्या स्पर्शाने अंतर-हृदय बहरते आणि जीवन अमूल्य आहे हा बोधदेखील विकसित होतो. अद्वैत शैवमताचे ऋषिगण आपल्याला शिकवतात की, ज्या सृष्टीत आपण राहत आहोत, ती एखादी साधारण रचना नाही. सर्व लोकलोकांतरे आणि सर्व प्राणिमात्र हे झगमगणारे चितिकणच आहेत जे चितीमधून प्रसरित होतात, आणि जे चितीच्या परमानंदमय सारतत्त्वाची ‘घनीभूत रूपे’ आहेत, अर्थात ते सर्व ‘चित्-रसाची’ [चिद्रसाची] घनीभूत रूपे आहेत.’[१] हे ज्ञान आध्यात्मिक साधनेद्वारे प्रत्यक्ष अनुभूती बनते आणि बाबा मुक्तानंदांसारख्या परमानंदात लीन विभूतींचे जीवन व त्यांची वचने यांच्याद्वारे शिकण्याची तीव्र उत्कंठाही आपोआप निर्माण होते. आपण जसजसे या संतमहात्म्यांशी परिचित होत जातो, तसतसे स्वाभाविकपणे आपल्या अंतरी प्रश्न उद्भवतात. त्यांनी हे कसे साध्य केले असेल? त्यांनी भगवंताला सर्वस्व कसे अर्पण केले असेल? ते प्रेमाच्या महासागरात विलीन कसे झाले? बाबा आपल्याला सांगतात : भगवंताचे प्रेम “तुमच्या रोमारोमात” व्याप्त झाले पाहिजे.

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[१] प्रत्यभिज्ञाहृदयम्, सूत्र ४वरील भाष्य.